आश्वासन समिती

समितीची रचना, कार्यपध्दती व कामे

(अ) समितीची स्थापना

कार्यकारी प्रशासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण (Effective and meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याच्या उद्देशाने विधानमंडळ समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. सभागृहात विविध संसदीय आयुधाद्वारे उपस्थित केलेल्या चर्चेस उत्तरे देताना मा.मंत्रिमहोदयांकडून संबंधित बाबींसंबंधी वेगवेगळी कार्यवाही निदर्शक आश्वासने, अभिवचने (Assurances/Promises, Undertakings) दिली जातात. अशी आश्वासने एखाद्या समस्येसंबंधी/प्रश्नासंबंधी "विचार करण्यात येईल", "कार्यवाही करण्यात येईल", "सभागृहाला माहिती सादर करु, कायदे करु", "नियम करण्यात येईल" अशा स्वरुपाची असतात. संसदीय लोकशाहीमध्ये सभागृहात दिलेल्या आश्वासनांना एक प्रकारचे पावित्र्य व गांभीर्य असते (Solemn) त्यामुळे अशा आश्वासनांची, अभिवचनांची पूर्तता प्रशासन यंत्रणेमार्फत करण्यात येते किंवा कसे यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी (In order to watch the implementation of such assurances) आश्वासन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

आश्वासन समिती ही सभागृहाची महत्वाची समिती आहे. तत्कालीन विधानसभा अध्यक्षांनी निदेशानुसार नामनियुक्त केलेल्या नियम समितीच्या शिफारशीनुसार लोकसभेच्या धर्तीवर दिनांक २ डिसेंबर, १९५९ रोजी विधानसभा आश्वासन समिती प्रथम घटित करण्यात आली. सुरुवातीस या समितीचे एकूण १५ सदस्य होते. नियमात सुधारणा करुन समितीची सदस्य संख्या १९ इतकी करण्यात आली. विधानसभा नियम २२७ (१) नुसार सध्या या समितीची सदस्य संख्या १९ आहे. प्रत्येक वर्षी होणाऱ्या पहिल्या अधिवेशनात मा.अध्यक्ष समिती सदस्यांची तसेच समिती प्रमुखांची नामनियुक्ती करतात. समितीची मुदत एक वर्षापेक्षा अधिक नसते.

(ब) समितीकडे सुपूर्द केलेली कामे

(१) विधानसभेत प्रश्नोत्तराच्या वेळी तसेच प्रस्तावाच्या वेळी मा.मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आश्वासनांची, वचनांची व हमीची छाननी करणे,

(२) अशी आश्वासने, वचने व हमी शासनाने कितपत कृतीत अथवा कार्यवाहीत आणली आहेत, आणि

(३) आश्वासने, वचने इत्यादी कमीत कमी कालावधीत कृतीत अथवा कार्यवाहीत आणली गेली आहेत काय याबाबतचा समितीचा अहवाल सभागृहास सादर करणे.

(क) समितीचा कार्यपध्दती

विधानसभा नियम १६३ ते १९३ हे समित्यांच्या सर्वसाधारण कार्यपध्दती संबंधात आहेत. सदर नियम विधानसभा आश्वासन समितीस लागू आहेत. सन १९५९ साली नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विधानसभा आश्वासन समितीने दिनांक १८ मार्च, १९६० रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीत आश्वासनांची प्रमाण यादी संमत केली आहे :-

(१) ह्या बाबींवर विचार करण्यात येत आहे.

(२) मी ह्याबाबत लक्ष घालीन.

(३) चौकशी करण्यात येत आहे.

(४) माननीय सदस्यांना मी कळवीन.

(५) हे मुख्यत: केंद्र सरकारचे काम आहे. परंतु त्याबाबत मी चौकशी करीन.

(६) मी ह्यासंबंधी केंद्र सरकारला लिहीन.

(७) सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या सर्व सूचनांचा काळजीपूर्वक विचार केला जाईल, असे मी सभागृहाला आश्वासन देतो.

(८) माझ्या दौऱ्यांचे वेळी त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊनच मी परिस्थितीचा अभ्यास करीन.

(९) मी या बाबींवर विचार करीन.

(१०) मी ह्यावर विचार करीन.

(११) मी केंद्र सरकारला सुचवीन.

(१२) आम्ही याबाबत ठराव करु.

(१३) ह्याबाबत काय करता येईल ते मी पाहीन.

(१४) ह्यासंबंधी काही बोलण्यापूर्वी मला या बाबींची चौकशी करावी लागेल.

(१५) ही सूचना विचारात घेण्यात येईल.

(१६) ---------- रोजी भरणाऱ्या ----------सभेच्यावेळी ह्या बाबींचा विचार करण्यात येईल.

(१७) ह्या बाबींचे अजूनही परीक्षण चालू आहे व ह्याबाबत काही करावयास पाहिजे असल्यास ते नक्कीच करण्यात येईल.

(१८) ----------सरकारकडे ही बाब नेण्यात येईल.

(१९) मला ह्यासंबंधी माहिती नाही परंतु ह्याबाबत लक्ष घालण्याची माझी तयारी आहे.

(२०) आवश्यक ती माहिती गोळा करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

(२१) नियम तयार करतेवेळी ही सूचना ध्यानात ठेवू.

(२२) माननीय सदस्यांची तशीच इच्छा असेल तर मी फिरुन सूचना करीन.

(२३) अंतिम अहवाल तयार करण्यात आल्यावर त्याची एक प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

(२४) माननीय सदस्यांनी मी ते पुरवीन.

(२५) ते करता येईल असे मला वाटते.

(२६) माननीय सदस्यांचा आरोप खरा असेल तर ह्या बाबीची मी नक्की चौकशी करण्यास लावीन.

(२७) आम्हाला ते शोधून काढावे लागेल.

(२८) ह्याकडे मला ----------

--------सरकारचे लक्ष वेधावे लागेल आणि मला अशा आहे की, सरकार त्या दिशेने उपाययोजना करील.

(२९) कारवाई करण्याकरिता ही सूचना आहे व त्यावर विचार करण्यात येईल.

(३०) माहिती गोळा करण्यात येत आहे व ती विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात येईल.

(३१) मी परिस्थितीचे पुनर्विलोकन करीत आहे.

(३२) ज्याबाबत मंत्र्यांनी काही कारवाई करण्याची जरुरी आहे असे अध्यक्षांनी/उपाध्यक्षांनी ----------

----------अथवा सभाध्यक्ष तालिकेवर असणाऱ्या सदस्यांनी दिलेले निदेश.

(३३) ज्या सर्व मुद्यांबद्दल माहिती मागण्यात आली आहे व जी देण्याचे कबूल करण्यात आले आहे असे सर्व मुद्दे.

संबंधित विभागातून आश्वासनांची तातडीने परिपूर्ती होण्याच्या दृष्टीने विधानसभेच्या दिवसाच्या कार्यवाहीची असुधारित प्रत संसदीय कार्य विभागाला पाठविण्यात येते. संसदीय कार्य विभागाकडून या कार्यवृत्तामधील आश्वासनांची निवड केली जाते व निवड केलेली आश्वासने अधोरेखित करुन ती आश्वासन समितीकडे मान्यतेसाठी पाठविली जातात. अधोरोखित केलेली आश्वासने योग्य आहेत काय, याची आश्वासन समितीकक्षात तपासणी केली जाते. या व्यतिरिक्त काही आश्वासने असल्यास ती अधोरेखित करुन अशी सर्व आश्वासने ती ज्या विषयांसंदर्भात दिली आहेत तो विषय तसेच कार्यवृत्ताच्या ज्या पृष्ठावर आश्वासन अधोरोखित केले आहे त्या पृष्ठाचे क्रमांक नमूद करुन शाखा अधिकाऱ्यांनी मान्यता दिल्यानंतर ही आश्वासने संसदीय कार्य

विभागास पाठविण्यात येतात व संसदीय कार्य विभागाकडून ज्या विभागाशी संबंधित आश्वासने असतील ती त्या त्या विभागास कार्यवाहीसाठी पाठविली जातात. सभागृहात दिलेल्या आश्वासनांची परिपूर्ती ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक असते.

आश्वासनांची विवरणे सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतर संबंधित विभागाकडून आश्वासनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती आश्वासन समितीस पाठविली जाते. समिती या माहितीवर विचार करते व आपले अभिप्राय व्यक्त करते. आश्वासनाच्या परिपूर्तीबाबत समितीचे समाधान न झाल्यास या आश्वासनाच्या संदर्भात समिती संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेते व आश्वासनाच्या परिपूर्ततेबाबत विभागीय सचिवांकडून अधिक खुलासा घेते व त्यानुसार अंतिम अहवालात समिती आपले अभिप्राय व शिफारशी व्यक्त करते.

मा.मंत्रिमहोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांना अत्यंत महत्व असते. या आश्वासनांचा पाठपुरावा करण्याचे काम आश्वासन समिती करते. यामुळे अनेक सार्वजनिक महत्वाच्या प्रकरणांची तड लागली जाते. तसेच आश्वासनांच्या परिपूर्तीसंबंधात विभागीय सचिवांनी पाठविलेली माहिती व साक्षीच्या वेळी केलेला खुलासा समितीस समाधानकारक न वाटल्यास समिती विशिष्ट प्रकल्प वा कामाच्या ठिकाणास भेट देऊन स्थानिक अधिकाऱ्यांकडून आश्वासनाबाबत अधिक माहिती घेते व त्यावर आधारित आपल्या अहवालात अभिप्राय व शिफारशी व्यक्त करते.

या संदर्भातील काही निवडक व महत्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे उद्धृत करण्यात येत आहेत :-

सन २००१ च्या तिसऱ्या अधिवेशनातील आश्वासनासंबंधीचा विधानसभा आश्वासन समितीचा अकरावा अहवाल (२००८-२००९)

विषय : "सोलापूर जिल्हयामधील ग्रामीण भागांमध्ये अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या व्यक्तींच्या मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेत मोठया प्रमाणात गैरकारभार झाल्याबाबत" [(आश्वासन क्रमांक १३१५ ते १३१८(२००८ चे तिसरे अधिवेशन)]

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत.

१) समिती अशी शिफारस करते की, अपात्र विद्यार्थ्यांना वाटप केलेली शिष्यवृत्ती अशा विद्यार्थ्यांकडून वसूल न करता ती संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकांकडून व समाजकल्याण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनातून वसूल करण्यात यावी. (२) ज्या अस्तित्वात नसलेल्या शाळा आढळून आलेल्या आहेत. अशा शाळांतील संस्था चालकांची व मुख्याध्यापकांची नावे व फोटो शिष्यवृत्ती मिळवितांना दाखल केले गेले असेल त्यांच्याविरुध्द गुन्हा तर नोंदवावाच व त्याचप्रमाणे ही शिष्यवृत्ती

सुध्दा अशा संस्थाचालक व मुख्याध्यापक यांच्याकडून वसूल करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. (३) समिती अशी शिफारस करते की ही शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्यापासून तर समाजकल्याण अधिकारी यांची मंजुरी व त्यानंतर या शिष्यवृत्तींचे वाटप विद्यार्थ्याला होईपर्यंत यामध्ये सुटसुटित नियमावली तयार करावी जेणेकरुन यामध्ये पारदर्शक राहील अशी उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.

सन २००२च्या तिसऱ्या अधिवेशनातील आश्वासना संबंधीचा विधानसभा आश्वासन समितीचा बारावा अहवाल (२००८-२००९)

विषय :"राज्यातील प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती देखभाली करिता उपाययोजना सुचविण्यासाठी नेमलेल्या सुकथनकर समितीचा अहवाल" [(आश्वासन क्रमांक ५४,५६,५७,५८,५९)(सन २००५ चे पहिले अधिवेशन)]

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढील प्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत.

१) समिती शिफारस करते की, रेग्युलेटरची योजना ही प्रामुख्याने शहरी भागाशी संबंधीत असल्यामुळे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने नगरविकास विभागाशी समन्वय साधुन यासंदर्भात एक विधेयक लवकरात लवकर आणावे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र जीवन पाधिकरणाचीही एमएसईबीच्या कंपन्यांच्या धर्तीवर एक कंपनी नळ योजनांचे बांधकाम व पीएमसी बिंगसाठी, दुसरी कंपनी होल्डींग कंपनी, तिसरी कंपनी या योजनांचे ऑपरेशन व मेन्टेनन्स (ओ ॲन्ड एम) यासाठी याप्रमाणे पुर्नरचना करण्यात यावी. तसेच नळ योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी अधिकारी/कर्मचारी वर्गाला जास्तीत जास्त प्रशिक्षण देवून कार्य कुशल करण्यात यावे. (२) समिती शिफारस करते की, जी ग्रामपंचायत जास्तीत जास्त प्रमाणात विजबिलाची थकबाकी वसूल करील अशा ग्रामपंचायतीला त्याप्रमाणात जास्तीत जास्त रक्कम प्रोस्ताहन म्हणून देण्यात यावी जेणेकरुन अशी थकबाकी वसूल करण्यासाठी ग्रामपंचातींना प्रोस्ताहन मिळवून थकबाकीचे प्रमाण कमी होईल. (३) समिती शिफारस करते की, बंद असलेल्या सर्व योजना मार्गी लावण्यासाठी शासनाने एक कृती आराखडा तयार करावा त्यामध्ये प्रत्येक विभागाची/यंत्रणेची जबाबदारी कायम करुन विहित कालावधीत त्यांना नेमुन दिलेले काम पूर्ण करण्याचे निदेश देण्यात यावे. सदर सर्व योजना लवकरात लवकर कशा पूर्ण करता येतील हे पहावे जेणेकरुन महाराष्ट्रातील दुष्काळी भागाला तसेच पाण्याचा पुरवठा कमी असलेल्या गावांना कायमस्वरुपी पाणीपुरवठा करणे शक्य होईल.

सन २००२ च्या चौथ्या अधिवेशनातील आश्वासना संबंधीचा विधानसभा आश्वासन समितीचा तेरावा अहवाल (२००८-२००९)

विषय : "पश्चिम महाराष्ट्रातील कोयना व चांदोली अभय अरण्यातील नरक्या वनस्पतीची अवैध तोड इ ाल्याबाबत"[(आश्वासन क्रमांक ६९३ ते ७०१ (सन २००५ च्या तिसरे धिवेशन)]

उपरोक्त विषयाबाबत समिती पुढील प्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत.

१) श्री.बळकवडे यांनी दिनांक २० मे, २००५ रोजी सदर बाब तत्कालिन उपवनसंरक्षक श्री.लिमये यांचे निदर्शनास आणून दिल्यानंतर देखील त्यांनी सुध्दा कुठलीही कार्यवाही केलेली नाही. उपरोक्त सर्व बाबी आरोपींना फायदा मिळावा. त्यांचा ट्रक सुटावा, त्यांना अटक होऊ नये या दृष्टिकोनातून जाणीवपूर्वक केलेली आहे असे समिती या निष्कर्षापर्यंत आलेली आहे. तरी उक्त प्रकरणात सविस्तर चौकशी करुन श्री.सुनील लिमये त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे. (२) चांदोली राष्ट्रीय उद्यानातून नरक्या वनस्पतीची चोरटी तोड व तस्करी प्रकरणी श्री.साईप्रकाश यांनी कुठलीही सुरक्षा ठेव न घेता नरक्या पावडर कंपनीच्या ताब्यात देऊन शासनाचे ४४ लाख रुपयाचे नुकसान केले तसेच नरक्या प्रजातीच्या अवैध तोडी व वाहतुकीच्या गुन्हयांमधील ट्रकची माहिती जाहिरातीद्वारा प्रसिध्द करुन त्यावर सुमारे रुपये ३.०० लाखाचा निष्फळ खर्च केला. त्याचप्रमाणे या प्रकरणाच्या गुन्ह्यामध्ये एकूण किती वाहने वापरण्यात आली आहेत व त्यापैकी किती जप्त झाली आहेत. अद्याप किती वाहने जप्त करणे बाकी आहे. याबाबतची निश्चित माहिती समितीला आढळून आली नाही. म्हणून उक्त प्रकरणाबातची श्री.साईप्रकाश, तत्कालीन वनसंरक्षक यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

सन २००७ च्या तिसऱ्या अधिवेशनातील आश्वासना संबंधीचा विधानसभा आश्वासन समितीचा चौदावा अहवाल (२००८-२००९)

विषय : राज्यातील डी.एम.एल.टी धारकांवर प्रॅक्टीस करण्यासाठी घातलेली बंदी [(आश्वासन क्रमांक २३४०, २३४१ (सन २००७ चे तिसरे अधिवेशन)]

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढीलप्रमाणे शिफारशी केलल्या आहेत.

१) लॅब टेक्लिशिअन्स पाच ते सहा लाख रुपयांना ॲनलायझर विकत घेतात. त्या मशीनमध्ये रुग्णाचे रक्त टाकल्यानंतर ते मशिनच त्या बाबतीत अहवाल देत असते. त्यामुळे लॅब टेक्निशिबन जो

अहवाल देईल तोच अहवाल पॅथॉलॉजिस्ट देईल. तसेच या टेस्टचा रिपोर्ट आल्यानंतर त्यावर टेक्निशियनचे जे इत्प्रेशन असते ते महत्वाचे असते त्यात रुग्णावर कोणत्या प्रकरणी ट्रिटमेंट केली जाणे आवश्यक आहे याचा उल्लेख केलेला असतो. यासाठी डिमारकेशन करणे आवश्यक आहे. कोणते काम डी.एम.एल.टी धारकांनी करावे आणि कोणते काम करुन नये हे ठरविले गेले पाहीजे. कॉम्प्लीकेटेड टेस्ट डी.एम.एल.टी धारकांना परवानगी देण्यात येऊ नये अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. महाराष्ट्र मेडिकल प्रक्टीशनर्स ॲक्ट १९६१ च्यासेक्शन २ (२) मध्ये सुधारणा करणे हा महत्वाचा मुद्दा आहे. डिमारकेशनच्या बाबतीत सांगावयाचे म्हणणे विधी व न्याय विभागाने मत दिले होते त्यामुळे पुढे प्रगती होऊ शकली नाही. (२) राज्यातील डी.एम.एल.टी.धारकांनी अधिकृत नोंदणी झालेली नाही. ज्याप्रकारे डॉक्टरांचे मेडिकल कॉन्सिल आहे. आयुर्वेद कॉन्सिल आहे तसेच डेन्टल कॉन्सिल आहे. अशान्रकारचे असोसिएशनच डी.एम.एल.टी.धारकाकरिता नाही. त्यामुळे त्यांची एकूण संख्या किती आहे याची माहिती मिळणे कठीण आहे. म्हणून समिती अशी शिफारस करते की, राज्यातील डी.एम.एल.टी. धारकांसाठी पुन्हा पॅश मेडीकल कौन्सिलची स्थापना करण्यात यावी. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

सन २००३ च्या चौथ्या अधिवेशनातील आश्वासना संबंधीचा विधानसभा आश्वासन समितीचा पंधरावा अहवाल (२००८-२००९)

विषय : कोकण विभागातील ७ बंदरे व १९ जेट्टयांच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत. (अतारांकित प्रश्न क्रमांक ७३२५३ च्या उत्तराला दिलेले आश्वासन क्रमांक ६४५)

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढील शिफारस केलेली आहेत.

राज्यामध्ये देवदासींची संख्या मोठया प्रमाणात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सर्व जिल्हयातील देवदासींची गणना तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य रक्षक यांचेकडून करुन घेण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र राज्यात देवदासी व कार्यकर्त्यांचे मेळावे विभागवार संधारितपणे घ्यावेत व त्यांचे मनोगत समजून घेतले जावे व अन्य राज्यात अशच प्रकारच्या प्रथेबाबत व त्यांच्या पुनर्वसनासाठी कोणती उपाययोजना केली आहे या बाबतची माहिती गोळा करण्यात यावी इतर राज्यांची माहिती गोळा केल्यानंतर त्या राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्यात त्रुटी आढळून आल्यास त्या दुर करुन त्यांच्या पुर्नवसनाचे व त्यांच्या कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी त्वरित कार्यवाही करण्यात यावी. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

समाजामध्ये देवदासींकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा असून त्यांना समाजामध्ये चांगली वागणूक मिळत नाही. म्हणून देवदासी प्रथेचे निर्मूलन करणे आवश्यक आहे, असे समितीचे मत झालेले आहे.

सन २००४ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासना संबंधीचा विधानसभा आश्वासन समितीचा सतरावा अहवाल (२००८-२००९)

विषय :सन २००५-२००६ या वर्षासाठी रोजगार हमी योजनाकरिता तयार करण्यात आलेल्या २४०० कोटीच्या कृषि आराखडा [(आश्वासन क्रमांक ८२५,८२६,८२७, ८२८,८२९,८२९ अ (२००५ चे दुसरे अधिवेशन)]

उपरोक्त विषयाबाबत समिती पुढीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत.

समितीच्या निदर्शनास आले आहे की, शेततळयाच्या मापदंडामध्ये सुधारणा करण्यात आलेली नसल्यामुळे शेततळयांची कामे एकतर अपूर्णावस्थेत आहेत अथवा संख्येने कमी आहेत. **समिती शिफारस करते की, राज्यातील अल्पभुधारकांचे लक्षणीय प्रमाण पाहता या शकतकऱ्यांना उपयोगी पडेल अशारितीने शेततळयाचे निकष ठरविण्यात यावेत किंबहुना ज्या लाभार्थ्यांच्या शेतामध्ये शेततळे घ्यावयाचे आहे अशा लाभार्थ्यांकडील जमीनीचे क्षेत्रफळ विचारात घेऊनच त्याचप्रमाणे शेततळयाची लांबी, रुंदी, खोली इ.बाबी निश्चित करण्यात याव्यात. शेततळयाचे काम करताना त्याचे साईट योग्य असल्याची खात्री करण्यात यावी व निकषाप्रमाणे बांधकामाचा दर्जा टिकवावा अशीही शिफारस करित आहे. शेततळयांची योजना जवाहर विहीरी प्रमाणे वैयक्तिक लाभार्थी योजनेमध्ये घेण्यात यावे व शेततळयाचे पैसे शेतकऱ्यांना अग्रिम स्वरुपात देण्यात यावे अशी शिफारस समिती करते.**